प्रस्तावना

२६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यात यावा आणि त्या दिवसापासुन पुढील १५ दिवस 'लोकशाही पंधरवडा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे व त्यानिमित्त महाराष्ट्राच्या काना-कोप-यात स्थनिक स्वराज्य संस्था, नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती यांचेमार्फत 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी 'लोकशाहीचा जागर' संपूर्ण महाराष्ट्रात सतत घुमत रहावा, असे मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचे आदेश प्राप्त झाले होते. मुंबई शहरामध्ये "लोकशाही पंधरवडा-२०१९" मोठ्या उत्साहात, जल्लोषात साजरा करुन मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

या वर्षी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांमार्फत "लोकशाही पंधरवडा-२०१९" या कार्यक्रमाचे मुंबई महानगरपालिकेच्या वैभवशाली लौकिकांस साजेसे, अत्यंत नियोजनबध्द आयोजन करण्यात आले होते. "लोकशाही पंधरवडा-२०१९" कालावधीत उपनगरीय रेल्वेमध्ये जिंगल्स बेल्स वाजवून लोकशाहीचा सुर आळविण्यात आला. पदपथ व मोठ्या वस्त्यांमधुन काढलेल्या रॅलीज द्वारे 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावरील आसमंत दुमदुमवून टाकणा-या घोषणा नागरिकांचे लक्ष वेधून घेत होत्या, तर पथनाट्यातील कलाकारांचे अभिनय कौशल्य व त्यांच्या उद्बोधक संवादांनी 'जागरुक मतदार.....लोकशाहीचा आधार' या विषयाचे गांभिर्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यास आम्ही यशस्वी ठरलो.

या कार्यक्रमास विभाग कार्यालयातील सर्व अधिकारीवर्ग तसेच शहरातील नागरिक व शाळा, कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला.... किंबहूना त्यांच्या सक्रीय सहभागामुळेच हा कार्यक्रम व्यापक स्वरुपात आयोजित करणे मुंबई महानगरपालिकेस शक्य झाले.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये या कार्यक्रमांची Soft copy व Hard copy, चित्रस्वरुपात तयार केलेली अशी आकर्षक पुस्तिका येणा-या प्रत्येक निवडणुकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यास अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

उप आयुक्त (निवडणूक)

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’ पूर्वतयारी

➢ केलेली कार्यवाही –

मा.राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र श्री. ज.स. सहारीया साहेब यांचे ‘लोकशाही पंधरवडा-२०१९’ संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करण्याचे आदेश प्राप्त झाले. त्याअनुषंगाने, हा कार्यक्रम स्थानिक स्वराज्य संस्थांच्यामार्फत करावयाचा असल्याने या कार्यक्रमाचा आढावा तयार करुन मा. राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात आला. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडून प्राप्त आराखड्याबाबत मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र श्री. ज.स. सहारीया साहेब यांनी स्वतः दुरचित्रवाणी परिषद घेऊन ‘लोकशाही पंधरवडा-२०१९’ हा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात ‘फक्त एक अधिकारी सांगतो आणि एक अधिकारीच ऐकतो’ एवढयापुरता मर्यादित न राहता हा कार्यक्रम लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा व्हावा आणि त्याची जनजागृती तळागाळातील लोकांमध्ये व्यापक स्वरुपात व्हावी यासाठी दुरचित्रवाणी परिषदेमार्फत या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीबाबत सुचना देण्यात आल्या. त्याअनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने ‘लोकशाही पंधरवडा-२०१९’ संपूर्ण मुंबई शहरामध्ये साजरा करण्याबाबत केलेल्या पूर्वतयारीचा वृत्तांत.

१. आढावा बैठक –

मुंबई महानगरपालिका ही २४ प्रशासकीय विभागांमध्ये व्यापलेली असल्याने, या संपूर्ण कामाची व्याप्ती लक्षात घेता ‘लोकशाही पंधरवडा-२०१९’ हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला जावा, या उद्देशाने प्रत्येक विभागाकरिता एक संपर्क अधिका-याची नेमणूक करण्यात आली. तसेच, निवडणूक मुख्य कार्यालयात नियंत्रण कक्षाची स्थापना करुन त्यामध्ये ३ अधिका-यांची नेमणूक करण्यात आली. आढावा बैठकीमध्ये प्रत्येक विभागाकडून कार्यक्रमाच्या मंजुर आराखड्यानुसार काम पार पाडले जात आहे की नाही याबाबत देखरेख ठेवण्यासाठी सांगण्यात आले. तसेच, या कार्यक्रमाची सर्वांना नियमित माहिती उपलब्ध व्हावी व वेळोवेळी दिलेले आदेश सर्वांना प्राप्त होण्याकरिता ‘व्हॉट्सअप ग्रुप’ तयार करण्यात आला.

आढावा बैठकीची काही क्षणचित्रे.

२. बॅनर्स, स्टँडीज, पोस्टर्स व स्टिकर-

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे निर्देशानुसार, 'लोकशाही पंधरवडा-२०१९' या कार्यक्रमाअंतर्गत 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर आधारित वेगवेगळया प्रकाराचे व आकाराचे बॅनर्स, स्टँडीज, पोस्टर्स व स्टिकर तयार करण्यात आले.



बॅनर – ४ x ६ फीट



बॅनर – ४ x ६ फीट


राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र
बृहन्मुंबई महानगरपालिका
"लोकशाही पंधरवडा-२०१९"
दिनांक २६-१-२०१९ ते दिनांक १०-०२-२०१९
"जागरुक मतदार .....लोकशाहीचा आधार"
"लोकशाही, निवडणूक व सुशासन"
राज्य निवडणूक आयोग हा भारत निवडणूक आयोगापेक्षा भिन्न असल्याचे दर्शविणारा तक्ता
अ.क्र. | बाब | राज्य निवडणूक आयोगाची कार्यकक्षा | भारत निवडणूक आयोगाची कार्यकक्षा
१. | निवडणूकीचे टप्पे | प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रक्रिया तीन टप्प्यात पार पाडली जाते. १. प्रभाग रचना व आरक्षण. २. विधानसभा मतदार यादीचे विभाजन. ३. प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम राबविणे. | मतदार यादी तयार करणे व निवडणूक कार्यक्रम राबविणे.
२. | निवडणूकीचे होणाऱ्या एकूण जागांची संख्या | सुमारे २,५०,००० पेक्षा जास्त | लोकसभेच्या ४८ व विधानसभेच्या २८८
३. | नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची संख्या व त्यांचा दर्जा | २०,००० पेक्षा जास्त उपजिल्हाधिकारी(वर्ग१) पासून लिपिक (वर्ग-३) या दर्जाचे | लोकसभेसाठी ४८ व विधानसभेसाठी २८८ अधिकारी जिल्हाधिकारी (भा.प्र.से) आणि उपजिल्हाधिकारी अशा वरीष्ठ दर्जाचे
४. | महिलांसाठी आरक्षित जागा | एकूण जागांच्या किमान ५०टक्के | महिलांसाठी वेगळे आरक्षण नाही
५. | निवडणूकीशी संबंधित एकूण अधिनियम | ५ | १
६. | प्रती मतदार संघ सदस्यांची संख्या | किमान १ कमाल ५(बहुसदस्यीय) | फक्त १ (एक सदस्यसीय मतदार संघ)
"माझा देश माझी लोकशाही.....
टिकविन ती लावून बोटाला शाई"

स्टँडीज – ५ x ३ फीट



बॅनर – ४ x २ फीट

पोस्टर – ए३ आकाराचे

बृहन्मुंबई महानगरपालिका
''लोकशाही पंधरवडा-२०१९''
दिनांक २६-१-२०१९ ते दिनांक १०-०२-२०१९
''जागरुक मतदार .....लोकशाहीचा आधार''
''लोकशाही, निवडणूक व सुशासन''
* १८ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तींनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे.
* www.nvsp.in या वेबसाईटवर आपण online मतदार नोंदणी करु शकता.
* ceo.maharashtra.gov.in या वेबसाईट द्वारे आपण मतदार यादीतील आपले नाव तपासू शकता.
* ज्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट आहे त्यांनी त्यांचे मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर माहिती तपासून काही दुरुस्ती असल्यास, संबंधीत मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.
"थाडा देश माझी लोकशाही.....
टिकविन ती लावून बोटाला शाई"

स्टिकर – ५ x ८ इंच

३. चिंचपोकळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कबड्डी क्रीडा महोत्सवात जनजागृती

दि. ११.०१.२०१९ रोजी चिंचपोकळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कबड्डी महोत्सवात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाच्या वतीने मा. राज्य निवडणूक आयोगाचे महत्त्व / वेगळेपण दाखविणारे स्टँडीज व लोकशाही पंधरवड्याचे बॅनर्स लावण्यात आले. तसेच, ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची माहिती आणि 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' याबात उपस्थित प्रेक्षकांना आगामी लोकशाही पंधरवड्याबाबत माहिती देऊन नागरिकांनी या पंधरवड्यात मोठ्या संख्येने भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. त्याची काही क्षणचित्रे



४. जिंगल बेल्स -

बृहन्मुंबईत उपनगरीय रेल्वेतून ये-जा करणा-या प्रवाशांमध्ये प्रभावी जनजागृती होण्याकरिता व्यवस्थापक (मार्केटिंग), पश्चिम उपनगरीय रेल्वे, मध्य उपनगरीय रेल्वे व मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन तसेच, राष्ट्रीयकृत बँकांच्या विविध शाखांमध्ये ग्राहकांमध्ये 'लोकशाही पंधरवडा' या कार्यक्रमाची वातावरण निर्मिती होण्याकरिता जिंगल बेल्सची मराठी व हिंदी भाषेतील ध्वनीफीत नि:शुल्क प्रसारण करण्यासाठी पत्र पाठवून विनंती करण्यात आली.

लोकशाही पंधरवडा जिंगल - मराठी.mp3

Ctrl+ Click 1

लोकशाही पंधरवडा जिंगल - हिंदी.mp3

Ctrl+ Click 2

गावी-नागरी नांदो सुदृढ लोकशाही.m4a

Ctrl+ Click 3

लोकशाही निवडणूकव सुशासन.mp3

Ctrl+ Click 4

५. नगरसेवकांना जनजागृती करण्याबाबत आवाहन-

'दि. २६ जानेवारी, २०१९ ते १० फेब्रुवारी, २०१९' या कालावधीत "लोकशाही पंधरवडा-२०१९" या कार्यक्रमामध्ये "जागरुक मतदार, लोकशाहीचा आधार!" हा विषय (Theme) आधार मानून 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' याबाबत लोकप्रतिनिधींनी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबाबत त्यांना पत्राद्वारे आवाहन करण्यात आले.

देविदास शि. क्षीरसागर
करनिर्धारक व संकलक (प्र)

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिका
करनिर्धारण व संकलन खाते,
महापालिका मुद्रणालय इमारत, ३रा मजला,
५४६, ना. म. जोशी मार्ग,
भायखळा (पश्चिम), मुंबई - ४०० ०११.
दूरध्वनी क्र.:०२२-२३००५७५४
मोबाईक क्र.:९१६७२०३७७३
ईमेल:ac@mcgm.gov.in

अ.शा.क्र.निवडणूक/२७१८/सा.
दिनांक:१६.०१.२०१९

प्रति,
मा. नगरसेवक / नगरसेविका, प्रभाग क्र.

विषय:- दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करण्याबाबत.

संदर्भ:- १) क्र. रानिआ/रापनो-२०१७/लोकशाही पंधरवडा/प्र.क्र.१४/का.११ दि. २९ नोव्हेंबर २०१८ चे पत्र.
२) दि. ११.१२.२०१८ रोजी मा. राज्य निवडणूक आयोगाने आयोजित केलेली दुरचित्रवाणी परिषद.

महोदय,

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नोव्हेंबर-२०१७ पासून 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये विविध वक्त्यांनी मतदारांना मतदार जागृतीसंदर्भात लोकशाहीचे निरंतर शिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केलेले होते.

त्याअनुषंगाने, ह्या परिषदांमध्ये विविध वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार व सुचना लक्षात घेऊन दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा-२०१९" या कार्यक्रमामध्ये "जागरुक मतदार, लोकशाहीचा आधार!" हा विषय (Theme) आधार मानून 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' याबाबत लोकप्रतिनिधींनी नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असे मा. राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

यास्तव, आपणांस विनंती करण्यात येते की, दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत आपल्या प्रभागामध्ये "लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करण्यात यावा आणि त्यासाठी खालील बाबींचा समावेश असावा.

१. २६ जानेवारीसह सर्व प्रमुख दिवशी लोकप्रतिनिधींच्या भाषणामध्ये 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्यांचा समावेश असावा. (सोबत मजकूर जोडलेला आहे).

२. नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदविणे, मतदार यादीत नाव तपासणे, नावात बदल/दुरुस्ती असल्यास ती करुन घेण्यासाठी प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन करावे.

३. नागरिकांना 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' यांचे महत्व सांगणे.

४. लोकप्रतिनिधी, नगरसेवक यांनी निवडणूकीच्या दरम्यान नागरिकांना दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेबाबत माहिती देणे.

५. "जागरुक मतदार, लोकशाहीचा आधार!" अशा विषयांवर चर्चा घडवून आणणे.

६. या सर्व कार्यक्रमांची पुस्तिका तयार करुन मा. राज्य निवडणूक आयोगाला सादर करावयाची असल्याने, सर्व कार्यक्रमांचे निवडक फोटो निवडणूक विभागाच्या aetdo.election@mcgm.gov.in या ई-मेल आयडीवर आपण पाठविल्यास त्यातील निवडक फोटोंचा समावेश या पुस्तिकेत करण्यात येईल, ही विनंती.

(देविदास शि. क्षीरसागर)
करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका

६. मुंबई मॅरथॉनमध्ये जनजागृती-

'मुंबई मॅरेथॉन' या जागतिक व आशिया खंडातील सर्वश्रेष्ठ मॅरेथॉन स्पर्धेला लाभलेली जागतिक प्रसिध्दी व सर्व क्षेत्रातील लोकांचा सहभाग लक्षात घेता, दि. २०.०१.२०१९ रोजी आयोजित केलेल्या 'टाटा मुंबई मॅरेथॉन - २०१९' या कार्यक्रमामध्ये मुंबई महानगरपालिकेतर्फे 'लोकशाही, निवडणूक व सुशासन', याबाबत जनजागृती करण्यात आली. त्याची काही क्षणचित्रे खालीलप्रमाणे.



मुंबई मॅरथॉन २०१९ वासुदेवामार्फतजनजागृतीmp4

७. मा. महापौर महोदय व मा. आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांची संयुक्त पत्रकार परिषद-

दि. २४.०१.२०१९ रोजी महापालिका मुख्यालयातील पत्रकार परिषद दालनात मा. महापौर महोदय व मा. आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांची रहिवाश्यांमध्ये 'लोकशाही पंधरवडा' या कार्यक्रमाची वातावरण निर्मिती व्हावी याकरिता पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

पत्रकार परिषदेची प्रेस नोट

"लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करण्याच्या अनुषंगाने मा. महापौर व मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेसाठीची प्रेस नोट.

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी दि. १०.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगरपालिकेने 'दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९' या कालावधीत "लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करावा आणि त्यामध्ये 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर नागरिकांमध्ये जागृती करावी, असे कळविले आहे.

"भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने राज्य निवडणूक आयोगाची स्थापना होऊन राज्य निवडणूक आयोगास संविधानिक दर्जा प्राप्त झाला. या घटनेस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मा. राज्य निवडणूक आयोगाने विभागीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले. त्यावेळी झालेल्या चर्चा व परिसंवादामध्ये तज्ञांनी केलेल्या सुचनांनुसार 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर त्यांनी नागरिकांमध्ये निरंतर शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केलेली असून या विषयांवर दरवर्षी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करावा, असे सूचविले आहे. यावर्षी 'जागरुक मतदार... लोकशाहीचा आधार' हा विषय आधार मानून लोकजागृती करावी, असे आयोगाने कळविले आहे. यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाला स्थापनेनंतर संविधानिक दर्जा प्राप्त झाल्यामुळे निवडणूक कार्यपध्दतीत खालील सुधारणा करण्यात आल्या.

- निवडणूक प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिकाधिक पारदर्शक बनविली. यामध्ये संगणकीय प्रणालीद्वारे प्रभाग रचना, मतदार याद्या तयार करणे इत्यादि.
- नामनिर्देशन पत्रासोबत शपथपत्र व उत्पन्नाचा गोषवारा देणे आवश्यक केले.
- उमेदवाराच्या आर्थिक व गुन्हेगारी पार्श्वभूमीविषयक माहिती मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली.
- मतदारांच्या सोयीसाठी True Voter App ची निर्मिती केली.
- COP App (Citizen on Patrol) या मोबाईल App ची निर्मिती करुन आदर्श आचारसंहितेचे स्थानिक पातळीवर काटेकोरपणे पालन करणे शक्य झाले.
- NOTA ची तरतुद केली आणि NOTA ला सर्वाधिक मते पडल्यास अशा ठिकाणी फेर निवडणूक घेण्यासाठी तरतुद केली.
- प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या टप्प्यांवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राह्य धरण्यात येणारा दिनांक घोषित करता येत असल्याने, नव्या मतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठी पूर्व सूचना मिळते.

मुंबई महानगरपालिकेने "लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करण्यासाठी खालील कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

- मुंबई महानगरपालिकेतर्फे लोकशाही पंधरवड्यात करण्यात येणा-या विविध कार्यक्रमाबाबत सर्व प्रभाग समित्यांच्या बैठकांमध्ये "लोकशाही पंधरवडा-२०१९" हा विषय घेऊन या कालावधीत 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर तयार करण्यात आलेल्या आराखड्याबाबत माहिती देऊन विभागवार करावयाच्या कार्यक्रमाबाबत माहिती देण्यात आलेली आहे.
- 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर नागरिकांमध्ये जागृती करण्याकरिता सर्व नगरसेवकांना पत्र देऊन खालील आवाहन करण्यात आलेले आहे.
  1. २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनी नगरसेवकांनी त्यांच्या भाषणातून 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयाचे महत्व नागरिकांना समजावून सांगावे.
  2. नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदवा व मतदान करा, असे आवाहन करावे.
  3. 'जागरुक मतदार.. लोकशाहीचा आधार' या विषयावर चर्चासत्र घडवून आणावे.
- महानगरपालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांमार्फत त्या विभागातील अशासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या बैठकांचे आयोजन करुन त्यांना 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयी कार्यक्रमाची माहिती देतील व त्याबाबत नागरिकांमध्ये जागृती करण्यास आवाहन करतील.
- 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयाचे मुंबई शहरांमध्ये प्रमुख वर्दळीच्या ठिकाणी, विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्र, रुग्णालये, दवाखाने, घन कचरा विभागाच्या चौक्या येथे या कार्यक्रमाचे बॅनर्स लावण्यात येतील व महानगरपालिकेच्या कचरा वाहून नेणा-या वाहनांवर स्टिकर्स लावून जागृती करण्यात येणार आहे.
- प्रजासत्ताक दिनी मा. महापौर, मा. आयुक्त, प्रभाग समित्यांचे अध्यक्ष आणि इतर प्रमुख वक्त्यांच्या भाषणात 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयाचा समावेश असेल.
- 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर विभागीय स्तरावर नागरिकांमध्ये जागृती होण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वादविवाद, विभागामध्ये प्रभात फे-या, पथनाट्ये यांचे आयोजन करण्यात आलेले आहे.
- १८ व १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची निश्चिती करुन त्यांचे नाव मतदार यादीत अंतर्भुत करण्यासंदर्भात महाविद्यालयांना जिल्हा निवडणूक कार्यालयाशी समन्वय साधण्यास सांगण्यात येणार आहे.
- लोकशाही पंधरवड्याच्या कालावधीत मुंबई महानगरपालिकेतर्फे उपनगरीय रेल्वेमधून ३० सेकंदाची 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर 'जिंगल्स' प्रसारित करण्यात येणार आहे.

अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेतर्फे "लोकशाही पंधरवडा-२०१९" साजरा करण्यासाठी 'दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी, २०१९' या कालावधीत कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत, असे मी जाहिर करतो.

संयुक्त पत्रकार परिषदेमधील काही क्षणचित्रे

शुक्रवार, २५ जानेवारी २०१९ वृत्त मानस ३

लाटेवर आरूढ होऊन मतदान करूनका, महापौरांकडून मतदारांचे प्रबोधन

प्रतिनिधी

मुंबई, शुक्रवार : सध्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. लवकरच लोकसभेच्या निवडणुका जाहीर होतील. त्यासाठी मतदारांचे प्रबोधन म्हणून नागरिकांनी भावनेच्या आहारी जाऊन आणि लाटेवर आरूढ होऊन मतदान करू नये, असे आवाहन महापौर प्रि. विश्वनाथ महाडेश्वर यांनी केले.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मुंबई महापालिकेच्या निवडणूक विभागात दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत नागरिकांमध्ये 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर जनजागृती करण्यासाठी 'लोकशाही पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त महापालिका वार्ताहर कक्षात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत महापौर बोलत होते. त्यावेळी पालिकेचे निवडणूक विभागाचे उपकर निर्धारक व संकलक रमाकांत निकम, सहायक कारनिर्धारक व संकलक (निवडणूक) जयंत नाईक, निवडणूक अधीक्षक राम कराडे आदी उपस्थित होते.

महापौर पुढे म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार सुज्ञ असला पाहिजे, त्याचा आजूबाजूच्या घडामोडींबाबत अभ्यास असला पाहिजे. यासाठी मूलभूत अधिकारांबरोबर त्याने मूलभूत कर्तव्येही पार पाडायला हवीत. मतदान हे एक मूलभूत कर्तव्य आहे. त्यासाठी त्याचे प्रबोधन करण्यासाठी मतदार जनजागृती पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. निवडणुकीचा नेमका अर्थ काय, भावनेच्या आहारी जाऊन किंवा लाटेवर आरूढ होऊन नागरिकांनी मतदान करू नये, देशात सुशासन असेल तर शांतता नांदेल, सुराज्य येईल यासाठीच लोकशाही पंधरवडा आयोजित करण्यात येत असल्याचे महापौर म्हणाले.

या पंधरवड्यात नगरसेवकांमार्फत त्यांच्या प्रभागातील नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्याचे आवाहन करण्यात येणार आहे, तर शाळा-महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विभागामध्ये प्रभातफेऱ्या, पथनाट्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. एव्हीएम मशीन बाबत मात्र निवडणूक आयोगाचे कोणतेही निर्देश नाही असे सांगण्यात आले.

या जनजागृती पंधरवड्यालोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयाचे मुंबई शहरांमध्ये प्रमुख वदळीच्या ठिकाणी, विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्र, रुग्णालये, घाण कचरा विभागाच्या चौक्या येथे या कार्यक्रमाचे बॅनर्स लावण्यात येणार आहेत. कचरा गाड्यांवर स्टिकर्स लावून जनजागृती करण्यात येणार असल्याचेही महापौर प्रि. विश्वनाथ महाडेश्वर यांनी सांगितले. अशा प्रकारे मुंबई महापालिकेतर्फे लोकशाही पंधरवडा-२०१९ साजरा करण्यासाठी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०१९ या कालावधीत कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. असे सांगण्यात आले.

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’
दि. २६.०१.२०१९

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रथम नागरिक या नात्याने मा. महापौर, प्रि. श्री. विश्वनाथ महाडेश्वर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. त्यावेळी उपस्थित जनसमुदायांसमोर करण्यात आलेल्या भाषणामध्ये भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची माहिती देऊन ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयाबाबत जनजागृती करण्यासाठी मा. राज्य निवडणूक आयोग आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ’दि. २६ जानेवारी, २०१९ ते दि. १० फेब्रुवारी,२०१९’ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करणार असल्याचे सांगून, नागरिकांनी या ‘लोकशाही पंधरवडा’ कालावधीत मोठ्या संख्येने भाग घ्यावा व १८ वर्षावरील सर्व नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदवून येणा-या प्रत्येक निवडणूकीत मतदान करुन राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे संबोधण्यात आले. या कार्यक्रमामध्ये मा. महापौरांसमवेत श्रीम. हेमांगी वरळीकर, उप महापौर, श्री. अजोय मेहता, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मा. श्री. ए. एल. ज-हाड, अति. आयुक्त (शहर), मा. श्री विजय सिंघल, अति. आयुक्त (पू. उप.) व इतर मान्यवर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाची काही क्षणचित्रे

२६.०१.२०१९ रोजीचे मा. महापौरांचेभाषणमp4

अशाचप्रकारे मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांमधून प्रजासत्ताक दिन साजरा करुन राष्ट्रभावनेचे दर्शन घडविले व या प्रसंगी अध्यक्षांच्यावतीने 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयाचे महत्त्व सांगणारे प्रबोधनात्मक भाषण करण्यात आले. त्यावेळी,"लोकशाही पंधरवडा-२०१९" या कार्यक्रमाचे बॅनर्स लावून अधिकारीवर्गांमध्ये जनजागृती करण्यात आली व या कार्यक्रमाचे महत्त्व त्यांच्यामार्फत घरोघरी पोहचविण्यासाठी आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमांची काही आकर्षक क्षणचित्रे..

प्रशासकीय विभाग – 'बी'

प्रशासकीय विभाग – 'आर/मध्य'

प्रशासकीय विभाग – 'टी'

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. २७.०१.२०१९

प्रशासकीय विभाग – आर/उत्तर

‘आर/उत्तर’ मधील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या रहिवाश्यांना लोकशाही पंधरवड्याबाबत मार्गदर्शन करतानाचे क्षणचित्र व ध्वनीचित्रफीत

WhatsApp Video 2019-01-28 at 2.52.42 AM.mp4

Ctrl + Click -> Ok

ज्येष्ठ नागरिकांना लोकशाही पंधरवड्याबाबत मार्गदर्शन करतानाचे क्षणचित्र व ध्वनीचित्रफीत

WhatsApp Video 2019-01-28 at 3.12.07 AM.mp4

Ctrl + Click -> Ok

मुलांना लोकशाही पंधरवड्याबाबत मार्गदर्शन करतानाचे क्षणचित्र व ध्वनीचित्रफीत

WhatsApp Video 2019-01-28 at 3.13.57 AM.mp4

Ctrl + Click -> Ok

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. २८.०१.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘टी’

‘टी’ विभागातील मुलुंड कॉलनी म.न.पा. शाळेतील चित्रकला स्पर्धेची क्षणचित्रे

‘टी’ विभागातील मुलुंड येथील दीनदयाल उपाध्याय म.न.पा. शाळेतील जनजागृती पदयात्रेची क्षणचित्रे

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. २९.०१.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘के/पश्चिम’

‘के/पश्चिम’ विभागातील डी. एन. नगर, म.न.पा. सार्वजनिक शाळेत/महाविद्यालय येथे आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेची क्षणचित्रे



प्रशासकीय विभाग – ‘एम /पश्चिम’

‘एम/पश्चिम’ विभागातील चेंबुर नाका मुंबई महानगरपालिका शाळेने आयोजित केलेल्या पथनाट्याची क्षणचित्रे व ध्वनीचित्रफीत

mwest chembur pathnaty.mp4

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ३०.०१.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘ई’

भायखळा पूर्व म.न.पा. शाळा येथे मा. श्री. शंकरवार, उप आयुक्त (परि.-२), सहा. आयुक्त श्री. आर्ते साहेब, श्री. राम कराडे, निवडणूक अधीक्षक यांच्या उपस्थितीत स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेमध्ये लोकशाही पंधरवड्याचा बॅनर लावून जनजागृती करतानाची क्षणचित्रे

प्रशासकीय विभाग – ‘टी’

मुलुंड येथील डी. डी. उर्दू शाळेत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेची क्षणचित्रे

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ३१.०१.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘ए’

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, पोस्ट ऑफीस जनरल मुख्यालय, चर्चगेट रेल्वे स्थानक तसेच विभागातील काळा घोडा महोत्सव या प्रमुख वर्दळीच्या ठिकाणी लोकशाही पंधरवड्याचे बॅनर्स लावून जनजागृती करतानाची क्षणचित्रे

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ०१.०२.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘एम/पश्चिम’

प्रशासकीय अधिकारी (शाळा), एम/पश्चिम विभागातर्फे लोकशाही पंधरवडा अंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित केलेल्या निबंध स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा तसेच चित्रकला स्पर्धेची काही क्षणचित्रे



‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ०२.०२.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘एम/पश्चिम’

प्रशासकीय अधिकारी (शाळा), टी विभागातर्फे लोकशाही पंधरवडा अंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेची काही क्षणचित्रे

प्रशासकीय विभाग – ‘टी’

प्रशासकीय अधिकारी (शाळा), टी विभागातर्फे लोकशाही पंधरवडा अंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेची काही क्षणचित्रे

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ०३.०२.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘एफ/उत्तर’

एफ/उत्तर’ विभागातील एँटोपहिल येथील कोरबा-मिठागर, एस.आय.डब्लू.एस. महाविद्यालयामार्फत लोकशाही पंधरवडा अंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित केलेल्या जनजागृती रॅलीची काही क्षणचित्रे व ध्वनीचित्रफीत

FNorth Ward Rally.mp4

एफ/उत्तर’ विभागातील एँटोपहिल येथील कोरबा-मिठागर, एस.आय.डब्लू.एस. महाविद्यालयामार्फत लोकशाही पंधरवडा अंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयावर आयोजित केलेल्या पथनाट्याची काही क्षणचित्रे

‘लोकशाही पंधरवडा-२०१९’

दि. ०३.०२.२०१९

प्रशासकीय विभाग – ‘आर/उत्तर’

आर/उत्तर विभागातील दहिसर येथील शीख बांधवांच्या मासिक प्राथनास्थळी गुरुद्वारामध्य विभाग निरीक्षक श्री. सत्यवान मेस्त्री यांचेकडून जनजागृती करण्यात आल्याचे क्षणचित्र व ध्वनीचित्रफीत

गुरुद्वारामध्येजनजागृतीmp4

प्रशासकीय विभाग – ‘ई’

‘ई’ विभागातील भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान (राणी बाग) यांनी आयोजित केलेल्या २४ वे झाडे, फूले, फळे प्रदर्शन कार्यक्रमात “लोकशाही पंधरवडा” कार्यक्रमाअंतर्गत ‘लोकशाही, निवडणूक व सुशासन’ या विषयाचे बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आल्याची क्षणचित्रे व ध्वनीचित्रफीत

राणी बागेत जनजागृतीmp4